श्री आर.एच.पांडव, भा.व.से. (सेवानिवृत्त) यांना निवडश्रेणी मंजूर करुन वनसंरक्षक व मुख्य वन संरक्षक पदावरील पदोन्नतीसाठी मानीव दिनांक देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्रमांक : आयएफएस-२०१७/प्र.क्र.४३८/फ-७
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक - ०८ फेब्रुवारी, २०१८

वाचा :

१) शासन आदेश ,महसूल व वन विभाग, क्र.एएफओ १३०७/ प्र.क्र. १३२/ फ-७, दि. २८.१२.२००७
२) पर्यावरण, वनेव जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे आदेश क्र. १२०११/१७/२०१४-AVU दि. २९.११.२०१७
३) पदोन्नती छाननी समितीची निवडश्रेणी व वनसंरक्षक पदावरील पदोन्नतीचे दि. २२.१.२००९ व मुख्य वनसंरक्षक पदावरील दि. ७.६.२०१२ च्या बैठकांचे इतिवृत्त
४) शासन आदेश, महसूल व वन विभाग क्र. आयएफएस १००७/ प्र.क्र. १९५/भाग-१/ फ-७, दि. २७.४.२००९
५) शासन आदेश, महसूल व वन विभाग क्र. पदोन्नती २०११ / प्र.क्र. २२४/फ-७, दि. ४ .११.२०११
६) पदोन्नती छाननी समितीच्या दि. २३.१.२०१८ च्या बैठकीचे इतिवृत्त

शासन आदेश :-

श्री आर.एच.पांडव, भा.व.से. हे दिनांक ३१ मार्च,२०१३ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.

२. श्री आर.एच.पांडव हे राज्य शासनाच्या सेवेत कार्यरत असताना उत्पादीत मालाची वाहतूक करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेमध्ये झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने त्यांच्याविरुध्द अखिल भारतीय सेवा (शिस्त व अपील) नियम, १९६९ च्या नियम ८ अन्वये शिस्तभंगाची कारवाई सुरु करण्यात आली होती. केंद्र शासनाच्या दि. २९.११.२०१७ च्या आदेशान्वये उक्त दोषारोपांच्या अनुषंगाने श्री.पांडव यांना दोषमुक्त करण्यात आले आहे.

३. श्री पांडव यांच्याविरुध्द सुरु असलेल्या शिस्तभंग विषयक कारवाई च्या अनुषंगाने पुढील पदांवरील त्यांच्या पदोन्नतीचा निर्णय जाणीवपूर्वक राखून ठेवण्यात आला होता. या कारणास्तव दि. २२.१.२००९ रोजीच्या पदोन्नती छाननी समितीव्दारे श्री पांडव यांचे निवडश्रेणी पदोन्नतीचे निष्कर्ष सिलबंद लिफाफ्यामध्ये ठेवण्यात आले. त्याचप्रमाणे श्री पांडव यांना निवडश्रेणी लागू झाली नसल्याच्या कारणाने वनसंरक्षक व मुख्यवनसंरक्षक पदावरील पदोन्नतीकरीता पदोन्नती छाननी समितीव्दारे त्यांचा विचार करण्यात आला नाही.

४. संदर्भ क्र. २ येथील केंद्र शासनाच्या दि. २९.११.२०१७ शासन आदेशान्वये श्री पांडव, भा.व.से. (सेवानिवृत्त) यांच्या विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई अंती त्यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली असल्याने त्यांच्या वनसंरक्षक व मुख्य वनसंरक्षक पदावरील पदोन्नतीचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात

आलेल्या दि. २३ जानेवारी,२०१८ च्या पदोन्नती छाननी समितीव्दारे त्यांचे निवडश्रेणी पदोन्नतीबाबतचे सिलबंद लिफाफे उघडण्यात आले. श्री पांडव हे निवडश्रेणी पदोन्नतीकरीता पात्र आढळून आले आहेत. यास्तव श्री पांडव यांना दि. १ जानेवारी,२००६ पासून निवडश्रेणी (वेतनश्रेणी १४३००-४००-१८३००) मंजूर करण्यात येत आहे.

५. श्री पांडव यांना निवडश्रेणी मंजूर करण्यात आली नसल्याने वनसंरक्षक व मुख्य वनसंरक्षक पदावरील पदोन्नतीकरीता तत्कालीन पदोन्नती छाननी समित्यांव्दारे त्यांचा विचार करण्यात आला नव्हता. उक्त प्रमाणे ते दि. १/१/२००६ पासून निवडश्रेणीत पदोन्नतीस पात्र ठरल्याने दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी आयोजित करण्यात आलेल्या पदोन्नती छाननी समितीने श्री पांडव यांची वनसंरक्षक व मुख्य वनसंरक्षक पदावरील पदोन्नतीकरीता पात्रता तपासली असता ते पात्र आढळले आहेत. सबब, श्री पांडव यांचे निकटचे कनिष्ठ अधिकारी श्री ए.जे.कांबळे, भावसे (सेवानिवृत्त) यांच्या वनसंरक्षक व मुख्य वनंसरक्षक पदावरील पदोन्नतीचा दिनांक मानीव दिनांक म्हणून पूर्वलक्षी प्रभावाने खालील प्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

अ.क्र.	**पदोन्नतीचे पद**	**वेतनश्रेणी**	**निकटतम अधिकाऱ्याचे नाव/ पदोन्नतीचा दिनांक**	**पदोन्नतीच्या पदाचा मंजूर करण्यात येत असलेला मानीव दिनांक**
१	वनसंरक्षक	१६४००-४५०-२००००	श्री ए.जे.कांबळे दि. ४.११.२०११	दि. ४ नोव्हेंबर,२०११
२	मुख्य वनसंरक्षक	३७४००-६७००० ग्रेड पे १०,०००	श्री ए.जे.कांबळे, दि. १२.३.२०१३	दि. १२ मार्च,२०१३

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२०८१६३३०५५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.02.08 16:39:42 +05'30'

(वीरेंद्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रति :

श्री आर.एच.पांडव, भा.व.से. (सेवानिवृत्त),
२०४, गणेश-स्नेहल अपार्टमेंट, श्रध्दानंद पेठ,
एस.अंबाझरी रोड, नागपूर

प्रत :

१. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

२. मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
५. अप्पर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक),नागपूर
६. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ
७. मुख्य वनसंरक्षक (मुल्यांकन),नागपूर
८. उप वनसंरक्षक (प्रादेशिक), यवतमाळ
९. विभागीय वन अधिकारी (मुल्यांकन),चंद्रपूर
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर
११. महालेखापाल , १ / २- (लेखापरिक्षा/ लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर
१२. सहायक संचालक, भावसे लेखा विभाग, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. निवड नस्ती/ वैयक्तिक नस्ती.